
ईस्पर्श
वर्ष पहिले. अंक आठवा
जानेवारी २०१३
ई साहित्य प्रतिष्ठान

इत्यर्थ
वर्ष पहिले अंक आठवा
जानेवारी २०१३

संपादक मंडळ
नाम गुम जायेगा: ठाणे
सृजा: औरंगाबाद
तनवीर सिद्दिकी : छत्तीसगढ

इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यात व्यक्त केलेली मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

©लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित. प्रकाशनाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानकडे सुरक्षित. या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचा उपयोग किंवा पुनर्मुद्रण करण्याआधी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवष्यक आहे.

संपर्क : ईसाहित्य प्रतिष्ठान
जी ११०२
अकरावा मजला
ईटर्निटी
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे
ठाणे
४००६०४

मो: ९८६९६७४८२०

वेबसाईट: www.esahity.com/
etyarth.blogspot.in
ईमेल: etyarth.esahity@gmail.com
esahity@gmail.com

# संपादकीय
## सृजा

यंदाचा इत्यर्थचा अंक जरा उशीराच निघतो आहे. कारण सांगायचं झाल्यास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं नाव घ्यावंच लागेल. यंदाच्या चिपळूण संमेलनात सहभागी होण्याचा योग जुळून आला. संमेलनात ई-साहित्य प्रतिष्ठानला उत्तम प्रतिसादही मिळाला. तो एक आगळाच अनुभव होता. काही अंशी आम्ही रोज करत असलेल्या मेहनतीला मिळालेली आगळी वेगळीच पावती म्हणावी लागेल.

मराठी साहित्य विश्व हे माझ्यासारख्या ऑनलाईन संपादकासाठी ऑनलाईनच मर्यादित होतं आजवर. पण संमेलनात अनेक अनेक लोकांच्या ओळखी झाल्या. मंगेश तेंडुलकर, अच्युत पालव, अनंत भावे, उत्तम कांबळे यांसारख्या लोकांसमोर बोलण्याची, त्यांच्यासोबत काही थोडा वेळ घालवण्याची संधी मिळाली, अगदी अद्भुत वाटत राहिले.

त्यासोबतच आणखी एक गोष्ट लक्षात आली ती निरिक्षणातून. इतक्या सगळ्या लोकांना प्रथमच भेटले. त्यामुळे प्रत्येकच माणूस एक नवं कोडं बनून समोर येत गेला. मानवी स्वभावाच्या विविध छटांच्या दर्शनाची संधी अशा सोहळ्यांमधूनच सर्वाधिक मिळत असावी. काही अशी माणसे जी खूप जाणतात नि बोलत काहीच नाहीत आणि अशीही माणसे जी जाणत मुळीच नाहीत तरीही बोलण्याचे थांबवत नाहीत.

आपली माणसे, आपले काम, आपल्या आवडी नि स्वप्ने यांची सुरेख सांगड म्हणजे हे संमेलन माझ्यासाठी ठरले.

हा अंक बनवताना ही गोष्ट सतत ध्यानात राहिली.. त्याचे हे ई-स्वरूप रसिकांना आवडेल अशी आशा आहे.

# मुलीच्या लग्नाची घाई झाली का?

## लीना कुलकर्णी

मुलगी उफाड्याची दिसते म्हणून लग्न उरकायला हवं. आजी-आजोबा थकले म्हणून नातीचं लग्न उरकायला हवं. मुलीच्या लग्नाच्या घाईची ही काही कारणं झाली का? स्वत:ची ओळख करून घेण्याचं स्वातंत्र्य न देता कोंदट नात्यांच्या, अवाढव्य जबाबदाऱ्यांच्या खोल खोल खाईत आपल्या मुलींना ढकलण्याची आई-बाबांना एवढी घाई का होते?

मनवाचं लग्न ठरलं आणि तिच्या वडिलांना, आजोबांना हायसं वाटलं. खरंतर मनवा आताशी कुठं बावीस पूर्ण झाली होती. पण उंच, उफाड्याच्या अन् काहीशा थोराड बांध्याच्या मनवाची आईवडिलांना काळजीच वाटायची. मनवा वीस वर्षाची झाल्यापासूनच घरात तिच्या लग्नाचा विषय सुरू झाला. आजोबा नव्वदीला आल्यामुळे त्यांच्या डोळयादेखत नातीचं लग्न व्हावं अशी त्यांची इच्छा होती. एक दिवस महेंद्रचं स्थळ सांगून आलं. त्यांच्याच म्हणजे सावकलार (सावजीकलार) समाजातला बत्तीस वर्ष वयाचा महेंद्र जिल्हा परिषदेमध्ये इंजिनिअर होता. सुशिक्षित लोक बघून बत्तीस वर्षांच्या महेंद्रशी बावीस वर्षाच्या मनवाचं लग्न ठरलंसुद्धा! मनवाची स्वत:ची लग्नासाठी मानसिक तयारी नव्हतीच. पण परंपरेनुसार तिच्या मतांची फारशी दखल न घेता घरच्यांनी तिच्या लग्नाची तारीखही ठरवून टाकली. साखरपुड्याची साडी घेताना, लग्नात मुलीच्या अंगावर घालण्यात येणाऱ्या सोन्या-नाण्यावरून थोड्या कुरबुरी झाल्याच. पण लग्न पार पडलं.

शिक्षण पूर्ण झालेलं नसल्यामुळे आणि आयटीआयची कॉम्प्युटर हार्डवेअरची शेवटची परीक्षा तोंडावर आल्यामुळे लग्नानंतर पहिल्या दिवसापासूनच मनवा घरातलं सगळं काम उरकून दुपारी अभ्यासाला बसायची. सासूबाईंना ते खटकायचं. अभ्यासाऐवजी मनवानं ग्रामगीता किंवा भगवद्गीताच वाचावी, असं तिच्या (डी.एड. झालेल्या) सासूला वाटायचं. हवेमध्ये उकाडा म्हणून मनवानं कूलर लावला तर 'तू काय श्रीमंत बापाची आहेस का?' असा सासू उद्धार करायची. मनवा आणि महेंद्रचं नातं नवीन होतं. घरातल्या गोष्टी मनवा समजून घेत होती. एकदा घरातले लाईट गेले. चटणी वाटण्यासाठी इनव्हर्टरवर मिक्सर लावायची मनवाला भीती वाटली. महेंद्र मदतीला पुढे आला; पण त्याच्या आईला ही गोष्ट खटकली. एकदा अशीच डबलबेडवरची चादर मनवानं धुतली. पण ती भलीमोठी जाड चादर तिला एकटीला पिळता येईना म्हणून एका बाजूनं तिनं महेंद्रला चादर धरायला सांगितली. पुन्हा त्याच्या आईला ही गोष्ट खटकली. माझ्या मुलाला घरकामाला लावते म्हणून त्यांनी खूप कांगावा केला.

महेंद्रला सकाळी पावणेआठची बस असायची. त्याला नाश्ता, जेवणाचा डबा मनवानं केलाच पाहिजे, असा पहिल्या दिवसापासून सासूचा दंडकच होता. मनवानंही तो मानला. पण सकाळी उठून, बंब पेटत घालून, उठल्या उठल्या महेंद्रला आंघोळीला गरम पाणीही तिनंच काढून द्यावं, असाही सासूबाईंचा आग्रह असायचा. तिनं पाणी काढून दिलं की महेंद्र म्हणायचा, ‘मला लहानपणापासून या गोष्टी हातानंच करायची सवय आहे तेव्हा माझं मी करीन.’ मनवाची द्विधा मन:स्थिती व्हायची. एकंदरच घरातलं वातावरण मनवाला विचित्र, तणावग्रस्त आणि कोंदट वाटायचं. तिच्यावर अनेक निर्बंध होते. तिनं एकटीनं बाहेर जाण्यावर बंधन होतं. तिनं सख्ख्या दिराशी बोललेलंही सासूला आणि नवऱ्याला चालत नव्हतं. मोकळ्या अन् सुदृढ वातावरणात राहिलेली मनवा या वातावरणाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत होती. पहिल्या आठ दिवसांतली एक घटना. एके दिवशी रात्री महेंद्र त्याचा मोबाईल बेडवर विसरून खोलीबाहेर गेला. नेमकी तेव्हाच मेसेज ट्यून वाजली म्हणून मनवानं इतक्या रात्री कोणाचा मेसेज असेल या उत्सुकतेपोटी मेसेज वाचला. तो मेसेज असा होता ‘इथून पुढे मी तुझ्या आयुष्यात कधीही इंटरफिअर करणार नाही. तेव्हाची गोष्ट वेगळी होती. आत्ताची गोष्ट वेगळी आहे. 'But still I Love You. I Miss You.' मेसेजखाली नाव नव्हतं. नंबर होता. मनवानं एका विशिष्ट नंबरवरून आलेले इतर मेसेजही चेक केले. ‘तुझं जेवण झालं का? तुला काय झालंय? तू रागावलास का? बोलत का नाहीस?’ अशा पद्धतीचे इतर मेसेजेस होते. महेंद्र आल्यावर मनवानं याबद्दल स्पष्ट विचारलं तेव्हा महेंद्र चपापला. ती मुलगी आपल्या ऑफिसमधली सहकारी आहे आणि तिला अशी मजा करायची सवय आहे, असं त्यानं स्पष्टीकरण दिलं.

तसं असेल तर मनवाचाही त्याबद्दल आक्षेप नव्हता. पण आपलं बिंग फुटेल या भीतीपोटी महेंद्र अस्वस्थ झाला. मात्र, लगेचच मनवाशी प्रेमात येऊन गप्पाच्या ओघात त्यानं मनवाला तिच्या पूर्वायुष्याबद्दल विचारलं. मनवानंही मोकळेपणानं तिच्या मैत्रीबद्दल महेंद्रला सांगितलं. एका मुलानं मला प्रपोज केलं होतं; पण मी त्याला नाही म्हटलं असंही तिनं सांगितलं. झालं ! महेंद्रच्या मनात संशयाचं पिशाच्च शिरलं ! किंवा आपलं बिंग फुटू नये म्हणून महेंद्रनं या गोष्टीचा इश्यू केला. त्यानंतर दोन दिवसांनी आलेल्या ‘फ्रेंडशिप डे’ला मनवानं तिच्या अनेक मित्रमैत्रिणींना मेसेजेस केले. त्यात त्या मित्रालाही मेसेज केला. महेंद्रनं तो वाचला आणि त्याचं डोकं फिरलं. खरंतर त्या मेसेजमध्ये काहीही आक्षेपार्ह नव्हतं. शिवाय त्याच्या मैत्रिणीचे मेसेजेस मनवानं फारच शांतपणे स्वीकारले होते; पण नवऱ्याला कितीही मैत्रिणी असल्या तरी चालतात; पण बायकोला मित्र नसलाच पाहिजे अशी वक्र मानसिकता आपल्या समाजात आहे. त्यामुळे महेंद्र नाराज होताच. सोळा दिवसांनंतर माहेरपणाला आणि परीक्षेला म्हणून माहेरी आलेल्या मनवाला अखेर या छोट्याशा प्रसंगामुळे कायमचं माहेरी राहावं लागलं ! तिचा कोणताही दोष नसताना !

मनवा सोळा दिवसांनंतर माहेरी आली तेव्हा आपण कायमचं इथं राहणार आहोत याची त्या बिचारीला कल्पनाही नव्हती. परीक्षा संपली. पण अतिश्रम आणि दगदगीमुळे ती आजारी पडली. महेंद्र तिला भेटायला आला. मीच तिला दवाखान्यात घेऊन जातो, असं म्हणून हॉटेलमध्ये घेऊन गेला. त्याच्या डोक्यातलं बायकोच्या मित्राविषयीचं भूत काही जाईना, आमचं असं काही नाही किंवा नव्हतंच असं मनवा कळवळून सांगत राहिली; पण महेंद्रला ते पटेना. यानंतर तो तिला माहेरी ठेवूनच घरी गेला. नंतर फोन करून मुलीला परत सासरी नेणार नाही, असं मनवाच्या वडिलांना फोन करून सांगितलं. मनवाचे वडील, काका, मामा, आजोबा तातडीनं मध्यस्थी करायला गेले. त्यावेळी घरात सगळे लोक असूनही फक्त सासू पुढाकार घेऊन बोलली. 'लेकीचे कपडे घेऊन जा. सुनेची परीक्षा आहे म्हणून माहेरी गेली आहे असं आम्ही आजूबाजूला सांगितलंय. तेव्हा झाकली मूठ सव्वा लाखाची असू द्या. आम्हाला मुलगी नांदवायची नाही,' असं सासूनं सांगितल्यावर मनवाच्या माहेरच्या लोकांना धक्का बसला. वृद्ध आजोबांना तर विलक्षण मानसिक धक्का बसला. ते अक्षरश: कोलमडले. मनवाच्या वडिलांनी तरीही परत परत समेट घडवण्याचा प्रयत्न केला. त्यावर महेंद्रनं मनवाच्या 'त्या' मित्राला मिटिंगमध्ये रुजू करा, असं सांगितलं. त्यानुसार तो मुलगा आला. आपले आणि मनवाचे काहीही संबंध नाहीत आणि कधीच नव्हते असं त्यानंही जीव तोडून सांगितलं. पण सगळं व्यर्थ ! '

त्या मुलाला मारून टाका नाहीतर पोलिसांकडे द्या' या महेंद्रच्या मागणीला मनवाच्या घरच्यांनी आक्षेप घेतला. आपली मुलगी आणि तो मुलगा निर्दोष आहेत हेही त्यांना माहीत होतं. मनवाच्या घरचे लोक या मागणीमुळे थक्क झाले होते. तरीही हतबल न होता मनवाच्या मागे ठामपणे उभे राहिले हे विशेष!

सध्या मनवा माहेरीच आहे. महेंद्रला अनेकदा फोन करूनही तो फोन उचलत नाही. नणंदांना फोन केल्यावर त्या सुशिक्षित नणंदांनी त्याला काहीही समजवण्याऐवजी 'त्याची इच्छा नसताना तू कशी तिथे राहणार?' असा उलट प्रश्न विचारला. मन उद्विग्न करणारी ही केस आहे. मुलगी उफाड्याची आहे म्हणून मुलीला तिची इच्छा नसताना उजवण्याची घाई करणं, त्यासाठी मुलाच्या आणि मुलीच्या वयातलं आक्षेपार्ह अंतराकडे डोळेझाक करणं, आजी-आजोबांच्या वाढत्या वयाचा आधार घेत मुलींना 'इमोशनल ब्लॅकमेल करून त्यांना लग्नासाठी तयार करणं, लग्न होण्याच्या आधीपासूनच सासरच्या लोकांच्या कुरबुरींकडे दुर्लक्ष करणं, लग्नाच्या पहिल्या दिवसापासून पोरसवदा सुनेला घरातल्या कामासाठी वेठीस धरणं, तिचा माणूस म्हणून जराही विचार न करणं, तिच्या आणि नवऱ्याच्या नात्यामध्ये तिच्या सासूनं नको इतकी लुडबुड करणं, नवऱ्याचं बायकोवर संशय घेणं, स्वत:वरच्या संशयाची सुई अन्याय्यपणे बायकोकडे फिरवणं, अशा एक ना अनेक गोष्टी मनवावर एक माणूस म्हणून अन्याय झाला हे सिद्ध करत होत्या.

खरंतर मनवा उफाड्याची होती तर पालकांनी तिला गर्लगाईड, एनसीसी किंवा कोणत्याही क्रीडा प्रकारात करिअर करण्याची संधी द्यायला हवी होती. पण उलट आपण वयापेक्षा थोराड दिसतो, असा आईवडिलांमुळे मनवात न्यूनगंड निर्माण झाला आणि त्यामुळेच इच्छा नसतानाही ती लग्नाला तयार झाली.

एक पालक म्हणून स्वत:च्या मुलामुलींच्या लग्नाची काळजी समजण्यासारखी असते. पण माणूस म्हणून स्वत:चीही ओळख न झालेल्या, मिळणाऱ्या स्वातंत्र्याची स्वत:ला समर्थ बनवण्यासाठी उपयोग करू न शकणाऱ्या मुली अशा फसल्या की दु:ख वाटतं. शिक्षण संपायच्या आत मुलींच्या लग्नाची इतकी घाई पालक का करतात? मुलीला स्वत:च्या पायावर उभं करण्यासाठी सक्षम करणं, तिला तिच्या आयुष्याबद्दल विचार करायला भाग पाडणं, स्वत:च्या आयुष्याची जबाबदारी स्वत: घ्यायला शिकवणं, कोणत्याही प्रसंगात धीर न सोडता स्वत्वासाठी लढायला शिकवणं या गोष्टी पालक म्हणून करणं फार आवश्यक आहे. मनवाच्या वडिलांनी तिच्या लग्नाकरता आठ ते नऊ लाख रुपये खर्च केले ते पैसे जर मनवाच्या उच्च शिक्षणाकरता वापरले असते तर..? प्रत्येक मुलीच्या पालकांनी मुलीच्या लग्नाची घाई करताना या घाईचे होणारे परिणाम आधी विचारात घ्यायला हवे आणि पुढे मुलीला जखडून टाकणाऱ्या या घाईपेक्षा तिच्या वाढीला उपयुक्त असं काय काय आपण करू शकतो याचा विचार करून तशी कृती करायला हवी. तर मुंगीच्या गतीनं का होईना पण मुलीच्या लग्नाबाबतची सामाजिक मानसिकता बदलेल!



# सुरुवात

## अरुण देशपांडे

कळत्या वयापासून माणूस प्रत्येक क्षणाला एका नव्या गोष्टीची सुरुवात करीत असतो. हाती घेतलेल्या कार्याचा आरंभ करीत असतो. कोणत्याही उपक्रमाचा शुभारंभ, नव्या गोष्टीला सुरुवात करणे, हे सगळे वाटते तितके साधे-सरळ सोपे नसते. पूर्व-तयारी शिवाय कार्यास सुरुवात करणे, योग्य नाही त्या साठी “अभ्यासोनॆ प्रकट व्हावे” असे समर्थ वचन लक्षात ठेवावे लागेल. उत्तम सुरुवात म्हणजे कार्या-प्रती यश हे हमखास समजावे. “well begin is half done “ हे सुभाषित "सुरुवात - आरंभ, प्रारंभ” यावर प्रकाश टाकणारे आहे. कार्याप्रती निष्ठा, ध्येय प्राप्तीसाठीची तळमळ, परिश्रम करण्याचे तयारी, मनात असलेली जिद्द, कार्यक्षमतेवर असलेला प्रबळ विश्वास या गुणांच्या  बळावर हाती घेतलेया कार्याची सुरुवात उत्तम तर होतेच होते, मिळणाऱ्या यशामुळे कीर्ती पण प्राप्त होते.  यश-प्राप्त करून लौकिक मिळवलेल्या व्यक्तींचे अनुभव आपल्या साठी प्रेरणा दायी असतात, या अनुभवाच्या पाठी असते ती मेहनत, जी "सुरुवात” करताना घेतलेली असते.

या गोष्टी अनुकरणातून येत नाहीत, त्यासाठी प्रत्यक्ष "कार्य“ करावे लागते, प्रेरणा घेणे वेगळे, आणि अंधानुकरण करणे हे वेगवेगळे असते. तीव्र इच्छाशक्ती, कठोर परिश्रम करण्याची तयारी, प्रबल आत्मविश्वास या गुणांच्या शिदोरीवर अनेक व्यक्तींनी खडतर मार्गावर सुरुवात करून, यश प्राप्ती केल्याची उदाहरणे आपल्या भोवती आहेतच. मनात कुतुहूल असणे, जिज्ञासा असणे, उत्सुकता असणे, नाविन्याची ओढ असणे हे सगळे असेल तर “नव्याने सुरुवात करू या” अशी भावना तयार होण्यास मदत होते. "जे होईल ते होईल.. मी हा उपक्रम सुरु करणारच” किंवा “हाती घेतलेले कार्य सुरुवात केली म्हटल्या वर पूर्ण होई पर्यंत थांबणे नाहे!” अशा प्रखर मानसिकता असलेल्या व्यक्ती सुरुवात केल्यावर माघार न घेता कार्य पूर्ण करतात.

ई साहित्य प्रतिष्ठान

"सुरुवात" हा शब्द मुळी पूर्तता होण्याशी निगडीत आहे. आरंभ म्हटला की शेवट आहेच. पूर्ण करणे हे "सुरुवात“ करण्याच्या कृतीवरून सुचित होणारे आहे. आणि कृती, कार्य करण्यासाठी, सुरुवात करावी लागते. आरंभ व्हावा लागतो. त्या कार्याला प्रारंभ करावा लागतो.

पुष्कळदा "सुरुवात” करणाऱ्या प्रेरकाची गरज समुदायाला असते. "तुम्ही सुरुवात तर करा, मी आहे ना सोबत”  हे आश्वासन असणे म्हणजे सुद्धा उत्तम अशी सुरुवात असते. आणि या साठी "संकल्प" करावे लागतात. उक्ती प्रमाणे कृती करावी लागत असते. तरच एखादी सुरुवात करता येऊ शकते.  तेव्हा कार्य संकल्प करावा, निष्ठेने कृती करावी. विश्वास पूर्वक ते कार्य करण्याची जिद्द बाळगणारा, कार्याची मोठ्या धडाकेबाज सुरुवात करतो, तेव्हा सर्वांनाच खात्री असते सुरुवातच इतकी चांगली शेवट पाहायलाच नको, शंभर टक्के यश!

मित्रांनो, नव -वर्षाचे स्वागत करू या आणि आपल्या संकल्प-पूर्ती साठी कार्यास "सुरुवात" करू या.

नव-वर्ष निमित्ताने तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

# वासंती शिल्प

## कविता मोकाशी

डोंगर चढता चढता त्याने बोट उंचावर नेले आणि सांगू लागला. हेच ते विधवेचे मंदिर आहे . खरंतर फार पुराण काळापासून येथे शंकराचे मंदिर आहे असं सांगतात. पण एक आख्यायिका सांगितली जाते ती एका विधवा स्त्रीची. तिला या देवळात आलेल्या अचानक मरणामुळे विधवेचे मंदिर असे या मंदिराला म्हणतात. तसं संध्याकाळी तर हा डोंगर भकास वाटतो मंदिरातली शांतता भिती घालते. केवळ नवी लग्न झालेली जोडपी इथे या मंदिरात रिवाजाप्रमाणे पूजा करण्यासाठी येतात. एरवी एकांत शोधणारी प्रेमी युगुल देखील इथे यायची नाहीत. पण तुम्ही....“ त्याचं वाक्य अर्धवट तसेच तोडून वासंती खाकरली आणि त्याला विचारू लागली "त्या विधवेच्या आख्यायीकेबद्दल काही सांगा “ "हो सांगतो" त्याने कपाळावर सावलीसारखा हात धरला आणि सांगू लागला.

"इथे फार वर्षापूर्वी म्हणजे साधारण चारशे पाचशे वर्षापूर्वी एक मोठ एकत्र कुटुंब राहत होतं. दुभत्याला गाय. चुलीला सरपण. वाड्याला कडेपाट तुळई. देवापुढे पूजा अर्चा. सारं काही व्यवस्थित होतं. त्याच घरात एक बालविधवा होती. एरव्ही तशी मान खाली घालून शांतपणे जे वाट्याला येईल ते सहन करत असे. पण जशी जशी ती मोठी होऊ लागली तशी तिची मती खुंटली. तिला वेड लागलं होतं असं तिच्या घरचे म्हणत. मध्यरात्री उठून सगळ अंगण लोटतसे. विहरितले पाणी उपसून घराच्या कौलावर फेकत असे. कुठेही पक्ष्यांची बेडकांची श्वानाची नर मादी जोडी दिसली की त्यांच्यावर दगड मारून किंचाळत हसत बसे. घरातल्या प्रत्येक बाईला उठवून म्हणत असे. मला भूक लागली आहे जेवायला वाढ. आणि तशीच मोठमोठ्याने हसत रडत निजून जात असे. पहाटे सासूच्या जावेच्या खोल्या लोटताना पिचलेल्या बांगड्या गोळा करे आणि प्रत्येक काच घुसवून घेई तिच्या हातात पायात. तरीही रडू वगैरे येत नव्हतं तिला. आणि दुपारी भर उन्हात या मंदिरात येऊन बसे. या पडक्या शंकराच्या मंदिरात कोणाचीच ये जां नव्हती तेव्हाही. तिच्या सासूच्या पोटी मेलेले एक अर्भक जन्माला आले तेव्हा त्याला घेवून धावत पळत इथे ती आली आणि इथेच प्राण सोडला. त्यानंतर त्या घराला वांझपणा आला. त्या घराला वारस संतती मिळाली नाही. विधवेचा कोणतातरी अदृष्य शाप, अतृप्त इच्छा छळते अस काहीतरी सांकेतिक स्वप्न त्या घरातल्या एका ज्येष्ठ माणसाला पडले. त्यानंतर त्याने आणि त्याच्या कुटुंबीयांनी इथे येऊन पूजा विनंती केली. पुढे वर्षभरातच त्या घराला मुल बाळ लाभले. नंतर ही प्रथाच पडून गेली की नवीन लग्न झालेल्या जोडप्याने गावात नवीन राहायला आलेल्या जोडप्यानॆ इथे यायचे आणि विधवेची पूजा करायची...“

विधवेची कहाणी ऐकून करुण हास्य वासंतीच्या चेहऱ्यावर उमटले होते. अगदी मंदिरातल्या शिल्पाकृतीसारखे. अचानक वीस [illegible] मागे जाऊन ती थांबली आणि ते मंदिर. ती वास्तू सारं परिचयाचं. तिच्या जीवाभावाच अगदी सख्य असणारं. मंदिरातल्या प्रत्येक छिन्नभिन्न अवस्थेत असणाऱ्या प्रत्येक मूर्तीवर तिने तिची निमुळती बोट स्नेहाने फिरवली. मूर्तीचा थंडगार स्पर्श मायेच्या उबेपेक्षा तिला उबदार वाटला. आणि हळू हळू वाळूची घडी विस्कटत जावी. पाण्यातल प्रतिबिंब मनाचा अचूक ठाव घेणार निघावं तसं तिला आठवू लागले....

शाळेचे दप्तर भरणारी वासंती आणि तो दिवस.. त्या बाईने मोठ्या प्रेमाने टेबलावर डबा आणुन ठेवला आणि वासंतीच्या डोक्यावर हात कुरवाळत म्हणाली "बेटा सगळा डबा खा हं. आईने प्रेमाने केला आहे" त्या बाईचा स्पर्श तिला नेहमी घृणास्पद वाटे ...त्यात कधीच वात्सल्य जाणवले नाही. तिचा हात झटकन तिने झटकला आणि म्हणाली "तू माझी आई नाहीस. सावत्र आई कधीच आई नसते..." त्यानंतर तिच्या सावत्र आईच्या डोळयातले पाणी देखील तिला दिसले नाही तिने माघारी वळून पाहिले नाही. दप्तर टेबलावर आपटत उचलून ती निघून गेली बाराचे ऊन आणि डोक्यात राग चालताना रस्तादेखील आग ओकतो आहे असे वाटू लागले. एका विखारी नागाच्या विषाची आग तिच्याच सावलीच्या जिव्हा चाटत होत्या. डोळयात पाणी? काय सांगायचे होते? कुणाला सांगायचे होते? ऐकणार कोण होते? कळणार तरी कुणाला? हातातल्या तळव्यात अश्रू घेवून चाललेली वासंती. अचानकपणे काहीतरी लक्षात आले शाळेच्या गृहपाठाची वही विसरली होती. पुन्हा पावले घराकडे वळू लागली पायात फक्त तिचीच सावली ती तुडवत निघाली. त्या सावलीला लांबी रुंदी उंची काहीच नाही. फक्त भूक होती उन्हाची

वासंती घरासमोर आली. खूप मोठी चूक झाल्यासारखे वाटले तिला. घरातली सारीच दारे सताड उघडी होती . दारांना खिडक्यांना कसलेच भान नव्हते. भिंतीवरच्या साऱ्याच फोटोनी डोळे मिटले होते. भांडी धुणी आपल्याच जागी निपचित पडून झोपली होती. घरातला टीवी मात्र तसाच सुरु राहिला होता. त्यावर रासक्रीडेत मग्न झालेल्या मोर लांडोरीला देहभान उरले नव्हते. मरणांतिक वेदनेने व्याकुळ झाल्यासारखे वासंतीला वाटले. तिच्या आईच्या फोटोवरचा चंदनाचा हार हलत असल्याचे फक्त तिला जाणवले. दाराला जोरात लाथ मारून वासंती घरातून निघाली

रस्त्याला फुटेल त्या वाटेने निघाली. काटेकुटे, उन्हाने तापलेले रस्ते कशाकशाचे भान तिला राहिले नव्हते अखेर ती एका दगडांच्या प्रेतात येऊन बसली शिवशिवणारे रक्ताळलेले डोळे.. तिचा राग कशानेच शांत होणारा नव्हता. इतक्यात तिचे लक्ष मंदिरातल्या अर्धनग्न अवस्थेत असणाऱ्या मुर्त्यांकडे गेले. खरंतर या आधीच त्या भंगलेल्या होत्या पण प्रत्येक दगडाचे तुकडे झाले पाहिजेत अशा आवेशाने ती प्रत्येक मूर्तीवर दगड ठेचत होती. आणि अखेर तिच्या हातातल्या दगडाचा टवका उडाला. तिच्या हातात घुसला. विजेसारखी धाय मोकलून तेव्हा रडत राहिली. रडता रडता तिथेच निजून गेली आणि जाग आली तेव्हा एका अनोळखी विश्वात ती होती. प्रत्येकजण तिची काळजी घेत होते पण त्यापैकी कुणीच तिचे आई वडील नव्हते. त्यापैकी आईच्या वयाची दिसणारी बाई तिच्या शेजारणीला सांगत होती "खरंच जागृत आहे ग ते विधवेचे मंदिर तिथे जाण्याचा अवकाश ही गोड मुलगी भेटली तिथे. देवाचा प्रसादच म्हणायचा. तशी रितसर पोलिस चौकशी केली आम्ही पण तिथे कुणीच या मुलीचे आई वडील नसल्याचे कळून आले. अनाथ असेल बिचारी“

वासंतीला ते बोलणे ऐकून तिच्या आई वडिलानी तिचा शोध घेतला की नाही घेतला याचे काहीच सोयरसुतक नव्हते एका तुरुंगातून मुक्तता झाल्यासारखे वाटत होते



# सुरवात एका सामान्य माणूस गीतलेखक बनण्याची

**राजेश मोराणकर**

मला वाटतं दोन वर्षांपूर्वी मी एकदा खूप कंटाळलो होतो. मला काहीतरी असा छंद पाहिजे होता ज्यात मी स्वत:ला हरवून जावे आणि कामाच्या स्ट्रेस चा विसर पडावा, वाचन किती करावे? गेली अनेक वर्षे वाचतोच आहे! पेपर मधील सुमार दर्जाची शब्दकोडी पण मजा देत नव्हती. भ्रष्टाचार, अत्याचार च्या बातम्या वाचून विटलो होतो. मन काहीतरी सकारात्मक /क्रियेटीव्ह /सजर्नशील असा आउटलेट शोधत होते.

आणि अचानक माझी नजर जगदीश खेबुडकर लिहित असलेल्या (सकाळ) कॉलम कडे गेली आणि मन प्रसन्नतेने भरून गेले.त्यात खेबुडकर त्यांनी गाणी कशी लिहिली ,विचार कसा केला ,त्याआधी इतरांनी लिहिलेल्या गाण्यांच्या 'मीटर' चा अभ्यास कसा केला वगैरे लिहित होते, मी दर आठवड्याला येणाऱ्या त्या सदराची आतुरतेने वाट पाहू लागलो .

नंतर त्यापुढे जाऊन आपण त्या गाण्याला एक "नवा अंतरा " लिहू शकतो का? हा विचार मनात आला. भाऊ साहेब पाटणकर म्हणतात तसे,

सांगेल काही भव्य ऐसी ,  
शायरी माझी नव्हे,  
तो कवींचा प्रांत ती,  
पायरी माझी नव्हे.

माझ्या अल्प समजाप्रमाणे,

कवी : कवी हा सर्व श्रेष्ठ असतो, तो कुणाचा मोताझ /बांधील नसतो, कवी अदभूत क्ल्पानाशी खेळत असतो ,शब्दांशी खेळत असतो.प्रभावीपणे नवरस निर्मिती करू शकतो.

गीतकार: जरी दिलेल्या वेळ, चाल,मीटर ,स्टोरीलाईन यांच्या बंधनात काम करीत असला तरी गीतकार हा ग्रेट असतो.त्याला छंद मात्रा यांचे ज्ञान असते,संगीताचे ज्ञान असते,विशेष म्हणजे भारतीय संस्कृती, तत्वज्ञान यांचा व्यासंग असतो.स्टोरी तील पात्रे आलेल्या परिस्थितीत कशा मानसिकतेत असतील ते अंतर दृष्टीने पाहण्याचे कसब त्यांच्यात असते.

तर आपण गाण्याला एक "नवा अंतरा " लिहू शकतो का , हा विचार मनात आला. आधीच ठरवून टाकले की गाण्याच्या "थीम" चा विचार करायचा, यमक वगैरे हा नंतर चा प्रश्न आहे.

मी त्यांच्या या गाण्याचा विचार करू लागलो ,

सत्य शिवा हून सुंदर हे

मूळ:

इथे मोल ना दामाचे ,
मोती होतील घामाचे,
सरस्वतीच्या प्रेमाचे,
प्रतिक रम्य शुभंकर हे
सत्य शिवा हून सुंदर हे

थीम : सिनेमात शाळा बांधतांना घेतलेले हे एक 'टाईम सॉंग' आहे. लक्षात घेतले संस्कृत शब्दांचे प्राबल्य आहे.

विचार : ओघाने विचार आला कर्मवीर पाटील यांचा ,स्वत: जास्त शिकले नव्हते तरी मुलांना शिकवण्याचा ध्यास घेऊन चालत, मिळेल त्या वाहनाने ते देणगी गोळा करण्यासाठी खूप फिरले. मग ठरले याच विचारावर नवा अंतरा लिहायचा ,यात माझे योगदान असावे म्हणून कर्मवीर च्या ऐवजी "कर्मयोगी " या शब्दाची योजना केली . स्फूर्ती वगैरे काही नाही, ठणठ्णीत जुळवा जुळवी करून हा अंतरा लिहिला,

कुणी कर्मयोगी धजतो ,
ज्ञान तपास्तव तो झिजतो
जरी अशिक्षित,निर्धन निज तो
ज्ञान-सहाय्य निरंतर हे
सत्य शिवा हून सुंदर हे

आता हे लिहिणे फ्लूक नाही हे सिध्द करण्यासाठी खेबुडकरांच्या पुढच्या गाण्याकडे वळलो ,

“देवापुढे मानुस पाला-पाचोळा रं”
थीम : देवापुढे माणूस यत्किंचित असतो.
विचार: देव वगैरे म्हटले असले तरी त्यापेक्षा 'निसर्ग' जास्त संयुक्तिक वाटले.निसर्गाच्या प्रकोपापुढे माणसाचे काही चालत नाही ,वादळे ,भूकंप, सुनामी ....जपान.जपान्यांची कष्टाची वृत्ती, महा युद्धातून सावरून ,अथक मेहेनेतीतून संपन्नता ..सुनामी... लक्षात घेतले की गाण्यात ग्रामीण शब्द आहेत.मग लिहिले,

कष्ट इमानाने त्याने गरुड झेप घेतली
शिरीमंती राहनीची 'गारूड' ठेप घेतली
एका सुनामीने झाला देश पांगळा रं
देवापुढे मानुस पाला-पाचोळा रं

( फिनिक्स एवजी गरुडझेप, रिच लाईफ स्टाईल साठी इतरांच्या मनावर 'गारूड' पडणारी ठेप असे काहीतरी लिहिले)
या लिहिण्यामुळे मनाला चालना आणि खूप उभारी मिळाली )

सुरवात तर झाली,आता छंदच लागला ,पुढचे गाणे !

“राजा ललकारी अशी दे, हाक  दिली साद मला दे”

थीम : शेतकर्यांचे जीवन /कामाचे सहचर्य

विचार: ते लिहिणेच काय ज्यात सामाजिक जाणीव नसेल ,शेतकर्यांचे दलालांकडून होणारे शोषण आणि अमानुष स्वस्त भावाने त्यांच्या शेतमालाची खरेदी करण्याची मानसिकता याचा निषेध करण्यासाठी लिहिले,

आठवते गेल्या वर्षी दिन-रात कष्ट झालं ,
कमावले जे शेतात, बाजारात नष्ट झालं,
काय  उलटा कायदा ,कदी दिसंल फायदा ,
भाव कांद्याला मिळू दे,
हाक दिली साद मला दे, राजा ललकारी..

असेच खेबुडकरांचे  खूप गाजलेलं गाणे ,

“दाम  करी काम येड्या ,दाम  करी काम”

थीम : पैशाचे जीवनात स्थान !

विचार:या विषयावर अनंत शेड्स आहेत, मी पाहिलेय , नाईलाजाने नोकरीसाठी वेगवेगळया गावात राहणारी जोडपी,घरदार जमीन जुमला झालापण  त्यांचा राहून गेलेला सहवास !

ह्या कवडी दमडीपाई  नवरा बायको ऱ्हातात दूर,
घडी भरचा नाही सहवास,
पैशाला आला पूर,
जगन गेल ऱ्हाऊन होता ,
ह्या पैशाचा गुलाम हो ,
दाम  करी काम येड्या ,दाम  करी काम

नंतरचे जगदीश खेबुडकरांचे गीत माझे(आणि सर्वांचेच) अतिशय आवडते ...

“धुंदी फुलांना धुंदी कळ्यांना”

यावेळी फार दूर गेलो नाही ,लग्ना आधी घरची परिस्थिती फारशी चांगली नव्हती , नंतर खूपच बरे दिवस आले म्हणून तिला अर्पण करून लिहिले,

तुझ्या संगती जीवनी अर्थ आला,
मन रंगती लोचनी स्वप्नमाला ,
जिणे आज माझे तुझा नजराणा ,
शब्दरूप आले मुक्या भावनांना.

खेबुडकरांपासून सुरवात करून मी माझी मुक्त मुशाफिरी हिंदीतही चालू ठेवली. उद्देश स्वत:ला आनंद मिळण्यासाठी नवा अंतरा लिहिणे आणि स्वत:कडेच ठेवणे

“मेरी दुनिया है तुझ में कही”

मूळ पलकोंपे तेरे रूप का सपना सजा दिया
पहली नजर में ही तुझे अपना बना दिया
है यही आरजू ,हर घडी बैठी रहो मेरे सामने

अब तो जहा भी मै चलू,मुझे तू ही तू मिले
तुझ से शुरू हो दिन मेरा ,तुझ से ही तो ढले
क्या यही,ख्वाब है, कह रही कुछ मुझे, जुल्फे सवारे हुवे
मेरी दुनिया है तुझ में कही, तेरे बिन मै क्या कुछ भी नहीं

एक जुने सुंदर गाणे

“कही ये वो तो नही”

गीत :कैफी आझमी ,चित्र :हकीकत ,लता .

मूळ: शक्ल फिरती है निगाहो में वोही प्यारीसी,
मेरी नस नस में मचलने लगी चिंगारी सी
छू गई जिस्म मेरा ,किसके दामन की हवा ,
कही ये वो तो नही

माझी भर इतने बरसोमे खयालोंमे न कोई दूजा ,
इतने बरसोमे मेरे दिल ने तुम्ही को पूजा ,
काम आयी है यहा,मेरी जन्मोकी दुआ ,
कही ये वो तो नही

पुण्याच्या जर्मन बेकरी स्फोट प्रकरण अजूनही सुटले नाही, वर्ष स्मृतीच्या फोटोखाली पेपरने कवी 'ग्रेस' यांच्या ओळी उर्धृत केल्या होत्या ,

'भय इथले संपत नाही '

मी वहीत श्रद्धांजलीपर ओळी लिहिल्या ,

हे वर्ष पुरे स्फोटाचे,
तेजात उजळती चेहेरे,
चाकर सारे पोटाचे,
नव वर्ष नवे ते मोहरे,
भय इथले संपत नाही.....
(अर्थ प्रत्येक जण लावेल तसा.)

कधी कधी आपली पायरी विसरून मी मराठीतल्या चिरंतन काव्य-शिल्पाला हात लावतो (या बाबत कधीकधी मी व.पु.काळे [illegible]
एका कथेत आलेला 'equality complex ' हे तत्व वापरतो.. )

हिरवाईची अथांग हि वळणे ,
अन वळणाची वाट,
कुठे नेई भारावल्या शरीरा
श्रुती ऐकती 'थाट',
क्षणोक्षणी नव चलतचित्र हे
अन थरारे देह सारा ... .
श्रावणात घननिळा बरसला

किंवा आरती प्रभूंचे अद्वितीय गीत, हृदय नाथाचे अदभूत संगीत लाभले.

ती येते आणिक जाते
येताना कधि कळया आणिते
अन् जाताना फुले मागते
येताना कधि अशी लाजते
तर जाताना ती लाजविते:
कळते काही उगीच तेही
नकळत पाही काहीबाही,
अर्थावाचुन असते 'नाही', 'हो', ही म्हणते.

addition साठी थीम  : आरती प्रभूंची 'ती' म्हणजे प्रतिभा त्यांना आपल्यातून दूर घेऊन गेली !

येतांना कधी अशी वागते,
चल संगती , कशी मागते,
आता नाही फिरून येत ,
घेऊन जाण्या दुरून येत,
चल  पुढे तू ,येते मागुनी मी ही म्हणते...

गुरु ठाकूर माझा आदर्श आहे (त्यांनीही सुरवातीला जुन्या गाण्यात खुप  नवीन अंतरे जोडले होते असे वाचले )

यमक बद्दल बोलायचे तर जेव्हा गीतकार उच्च दर्जाला पोचतात तेव्हा यमकाची सुद्धा फिकीर बाळगत नाहीत, उदाहरण  म्हणून आनंद बक्षी यांचे हे गाणे  ,

वो अचानक आ गई, यूँ नज़र के सामने
जैसे निकल आया घटा से चाँद
चेहरे पे ज़ुल्फ़ें, बिखरी हुई थीं
दिन में रात हो गई
एक अजनबी हसीना से...

रियाजाचे महत्व गायकाना असते तितकेच सर्वांनाच असते, पूर्वीचे कवी संस्कृत भाषांतराचे काम हाती घेत जेणेकरून नवीन शब्द, कल्पना हाताळल्या जातील व्यासंग वाढेल , मग नवीन गीतलेखकाने  काय करावे ,
मी भावाला जो संगीत जाणतो एक इ-मेल लिहिला होता,

संजू,

परवा रफीचे गाणं ऐकलं ,

**मी इक राजा हुं ,**
**तू इक रानी  है**
**कि ये इक सुंदर**
**प्रेम कहानी है**

खूप सोपं ,बाळबोध आणि तरीही सुंदर गाणं .

मला वाटतं छंद म्हणून self declared गीतलेखक बनण्यासाठी हे गाणं आदर्श आहे. जर नवीन अंतरे लिहायचे असतील तर 'थीम' समजून घेणे खूप आवश्यक आहे. 'थीम' : हिरो हिरोइन ला त्याचे प्रेम प्रपोज /पेश करतोय पण ती नासमझ आहे व तिच्या लक्षात येत नाही.

ओरिजनल … आनंद बक्षी साहेबांनी सहज लिहिला आहे ,संगीत लक्ष्मीकांत प्यारेलाल .

**मन मेरा इक महल हो जैसे**
**तू इसमें रहती है ऐसे**
**जैसे सीप में मोती है**
**सागर में पानी है**
**मैं इक राजा हूँ…**

मला वाटत या गाण्या चे असंख्य अंतरे लिहिले जावू शकतात

’कहानी है ’साठी यमक शोधून मग आधीच्या ओळी manupulate करून ठोकून मीटर मध्ये बसवायचा प्रयत्न आपण करू शकतो

**नमुना १** : 'जवानी' हा शब्द जुळतोय , हिरोइन अल्लड आहे असे मानले तर ,

कैसी अल्हड ना जाने
आयी जवानी है
मग आधीच्या ओळींसाठी काही नैसर्गिक known pairs चा उल्लेख करू शकतो ,जसे,

धरती पर आकाश का साया
xxxxxxxxxxxxx माया /पाया /गाया वगैरे

धरती पर आकाश का साया
नदियोने सागर रचैया
कैसी अल्हड है ना जाने
आयी ये जवानी है
मैं इक राजा हूँ...

नमुना २: पौराणिक

श्याम कि होती ही राधा
मन मेरा खोया ही आधा
फिरसे मुरली कि धूने
जग को सुनांनी है
मैं इक राजा हूँ...

किंवा

नमुना ३: राजकीय (विडंबन )

पोलिटिक्स में करते है युती
वरना पड सकती  है  जुती,
जैसे मैं हुं राम और
तू **जेठमलानी है**
मैं इक राजा हूँ...

नमुना ४: आय टी  वाल्यांनी काय करावे ,

मौसम है एक wifi जैसा
रूप तेरा है hifi  **ऐसा**
भेज रहा हु file तुझे
download  करानी है
मैं इक राजा हूँ...

नमुना ५: टपोरी...ते राजघराण्यातले असतील तर टपोरी का बोलतील ?

सुनती ही मैने क्या बोला
तू बोतल ही मैं हु कोला
कैसे बनती है रे तू
कितनी शाणी है
मैं इक राजा हूँ...

नमुना ६: फिलोसोफिकल

जन्मोसे ये गीत है गाया
बदले नाम बदली ये काया
वक्त ने लाया सामने ये ,
क्या मेहेरबानी है
मै इक राजा हु ......

नमुना ७: मेडिकल student मैत्रिणीला काय म्हणेल ?

होर्मोन्स का ये खेल है सारा ,
केमिकल लोच्या है न्यारा ,
झटक दे 'thermometer' तू
राउंड लगानी है .
मैं इक राजा हूँ...

सध्याचे नवीन गीतकारांची  स्टाईल खूप मोहक वाटते,

दिल कि तख्ती पर  हु लिखती
इश्का इश्का
जग क्या जाणे दिल को मेरे
इश्का  किसका
रब यार गलेसे सार  मेरे
मुझे क्या पर्वा इस दुनिया कि
तू जीत मेरी जग हार मेरी
मै हू ही नही इस दुनिया की.
तुम्ही दिन चढे
तुम्ही दिन ढले
तुम्ही  हो बंधू ,
सखा तूम्ही

addition ....

इस जमाने को पडेगा
झुकना झुकना,
चांद सूरज को पडेगा
रुकना रुकना
कुछ और पिलादे ओ साकी
मुझे क्या पर्वा इस दुनिया कि
तुझे जो पाया ,रब को पाया ,
मै हू ही नही इस दुनिया की
तुम्ही दिन चढे
तुम्ही दिन ढले
तुम्ही  हो बंधू ,
सखा तूम्ही

माझ्या ताजमहालाला तुमच्या 'विटा ' लावु  नका असे कोणीतरी ( अत्रे ?) addition घेणाऱ्या नाट्य कलाकाराला म्हटले होते, किंवा असे हि म्हणता येईल की कशाला त्यांच्या भरजरी 'शालूला' तुमची ठिगळे लावता ...पण काय करू लहान बालक सुरवातीला चालतांना मोठ्यांचाच हात धरते ना .

काही असो, सुरवात तर केली आहे.

# आता कसं वाटतंय?

- लिहावंसं वाटतंय? लिहा. कथा, कविता, लेख, निबंध, बालसाहित्य, प्रवासवर्णन... ई साहित्य कडे पाठवा. ई साहित्य साहित्य हे नवीन लेखकासाठी एक ताजंतवानं व्यासपीठ आहे
- ई साहित्य हा आताचा नवा स्मार्टट्रेंड आहे. तुमच्या मनात येणाऱ्या नव्या विचारांसाठी , व्यक्त होंण्यासाठी एक मिडियम.
- वाचावंसं वाटतंय? www.esahity.com वर भरपूर पुस्तकांचा खजिना आहे. ई साहित्याच्या ई पुस्तकांची सिडी सुद्धा उपलब्ध आहे. २५० पुस्तकं फ़क्त १५० रुपयांत घरपोच.
- मराठी मायबोलीसाठी काही करावंसं वाटतंय ? आपल्या १०-२०-३० मित्रांच्या मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना ई पुस्तकं विनामूल्य पाठवत राहू.
- आमचा पत्ता : esahity@gmail.com
- आता बरं वाटतंय?